# इतिवृत्तांत

**मेसर्स उध्दवेश ऊर्जा इथेनॉल प्रॉडक्सटस् प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ४०, जामोटी गाव, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा – नाशिक, महाराष्ट्र यांचा धान्यावर आधारित १०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या रेक्टिफाईड स्पिरिट/इथेनॉल/इ.एन.ए. उत्पादनासाठी आणि उप-पदार्थ डीडीजीएस, कार्बन-डाय-ऑक्साईड उत्पादनासाठी प्रस्तावित आसवणी प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स उध्दवेश ऊर्जा इथेनॉल प्रॉडक्सटस् प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ४०, जामोटी गाव, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा – नाशिक, महाराष्ट्र यांचा धान्यावर आधारित १०.० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेच्या रेक्टिफाईड स्पिरिट/इथेनॉल/इ.एन.ए. उत्पादनासाठी आणि डीडीजीएस, कार्बन-डाय-ऑक्साईड हे उप-पदार्थ उत्पादनासाठी प्रस्तावित आसवणी प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बुधवार दिनांक, २३ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता उध्दवेश पेटोलियम, इसार पेटोल पंप, तहाराबाद-मुल्हेर रोड, मुल्हेर तालुका- बागलान (सटाना), जि.नाशिक-४२३३०२ येथे आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिनांक १७.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक, २३ मार्च, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २२०३०३एफटीएस-०२४० दिनांक ०३-०३-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,नाशिक - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, - **सदस्य**
मुंबई यांचे प्रतिनिधी
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

**३)** उप प्रादेशिक अधिकारी, - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

श्री अमर दुर्गुळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री भागवत डोईफोडे, अपर जिल्हादंडाधिकारी, नाशिक तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नाशिक तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, १५वा माळा, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय अनेक्स, मुंबई येथील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी प्रदान केली. सदरहू प्रकल्प संवर्ग ५ (जी) आसवणी, ५जी (ए) धान्यावर आधारित इथेनॉल निर्मितीसाठी आसवणी या मोडतो.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर जनसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

मंडळ, नाशिक यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र " सकाळ " यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र " टाइम्स ऑफ इंडिया " या इंग्रजीत १८ फेब्रुवारी, २०२२ रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मा. जिल्हाधिकारी कार्यालय- नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, नाशिक, उप विभागीय अधिकारी, तालुका-सटाणा (बागलाण), जिल्हा-नाशिक, तहसील कार्यालय, सटाणा (बागलाण), ग्रामपंचायत कार्यालय- मुल्हेर, जामोटी, तालुका-सटाणा (बागलाण), जिल्हा-नाशिक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले. सदरहू सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण भांडवली गुंतवणूक रुपये २० कोटी आहे. सदरहू प्रकल्पात निर्माण होणा-या सांडपाण्यावर सी.पी.यु. मध्ये प्रक्रिया केली जाईल आणि त्याचा पुनर्वापर केला जाईल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज/ शून्य द्रव निःस्सारण

असेल. सदरहू प्रकल्पामुळे ३७ व्यक्तींना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराची संधि उपलब्ध होईल. पर्यावरण व्यवस्थापनसाठी भांडवली खर्च -३.३८ कोटी, तर आवर्ती खर्च-६९ लाख वार्षिक एवढा येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदार निधी/Corporate Environment Responsibility Fund (CER) Fund दरवर्षी राखून ठेवण्यात येईल आणि नियमांनुसार खर्च करण्यात येईल.

सदर प्रकल्पाच्या अनुशंगाने प्रकल्पा पासुन १० कि.मी. परिसरातील पर्यावरणाचा अभ्यास करण्यात आला त्यामध्ये हवा, पाणी, झाडे, माती इ. गोष्टींचा समावेश केला गेला. प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावरती प्राथमिक, व्दितीय तसेच तृतीय स्वरुपाची संयंत्रणा बसवली जाणार आहे. तर पाण्याचे बाष्पीभवन करुन कोणत्याही प्रकारे सांडपाणी बाहेर सोडले जाणार नाही व प्रकल्प उभारले नंतर सदर पर्यावरण काय परिणाम होणार याबाबत सादरीकरण केले.

त्यानंतर आयोजक यांनी उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम नांव व गाव स्पष्टपणे सांगावे जेणेकरुन त्याची नोंद बैठकीच्या इतिवृतांत घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की सदरहू समिती ही प्रकल्प मंजुरीचा वा नाकारण्याचा निर्णय घेत नाही. सदरहू समिती प्रस्तावित प्रकल्पाविषयी स्थानिकांच्या पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्यासाठी असून त्याची नोंद घेण्यात येऊन शासनास सादर करते. त्यनुसार शासन प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण व्यवस्थापन योजना राबविण्याची सूचना करते.

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प**

**सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

१) **श्री शरदकुमार शिवराम गांगुर्डे, राहणार- मुक्काम पोस्ट - मुल्हेर,तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिकः-**

**श्री शरदकुमार गांगुर्डे** यांनी

प्रकल्पामुळे मुल्हेर आणि परिसरात कुठल्या प्रकारचे प्रदूषण निर्माण होईल का? या प्रकल्पात किती लोकांना रोजगार दिला जाईल आणि नोकरी दिली तर पगार किती देण्यात येईल?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार** यांनी प्रकल्पातुन निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावरती प्राथमिक, व्दितीय तसेच तृतीय स्वरुपाची संयंत्रणा बसवली जाणार आहे. तर पाण्याचे बाष्पीभवन करुन कोणत्याही प्रकारे सांडपाणी बाहेर सोडले जाणार नाही. प्रकल्पात ५.० टीपीएचचा बॉयलर कार्यान्वित केल्यानंतर प्रदूषणाचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याचा अभ्यास केला असताना मुल्हेर गावाचाही विचार

करण्यात आलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे हवा प्रदूषणात जी वाढ होईल, ती विहित मर्यादेत असेल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की राष्ट्रीय वातावरणीय हवा गुणवत्ता मानकांच्या (National Ambient Air Quality Standards) आतच राहिल. प्रकल्पात स्थापित करण्यात येणारी चिमणी ही दिलेल्या निर्देशांपेक्षा जास्त उंचीची असेल. त्याचप्रमाणे लो एनओएक्स बर्नर प्रकल्पात वापरात येणार असल्याने NOx एनओएक्स या प्रदूषकाची गुणवत्ता मर्यादेत राहील कमी होईल. प्रकल्पात सल्फर डाय ऑक्साईडचे प्रमाण कमी होईल.

प्रकल्पात कुशल (Skilled) आणि अकुशल (Unskilled) कामगारांची गरज लागणार आहे. त्यात परिसरातील, जवळच्या गावातील लोकांनाच संधि देण्यात येईल. तसे आश्वासन हे प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेले आहे.

**२) श्री बन्सीलाल पंडीतराव बत्तीशे, राहणार-मुक्काम पोस्ट-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

**श्री बन्सीलाल बत्तीशे** यांनी सदरहू प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या आजूबाजूच्या शेतक-यांच्या विहिरी प्रकल्पातील सांडपाण्यामुळे दूषित होतील का?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सदरहू प्रकल्पात शुन्यावर आधारीत म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज/शून्य द्रव निःस्सारण तंत्रज्ञान अवलंबिण्यात येणार आहे. उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे सांडपाणी हे कन्डेनसेट पॉलिशिंग युनिटमध्ये (सीपीयु) प्रक्रियेसाठी पाठविण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या सीपीयुत सदरहू सांडपाण्यावर प्राथमिक (Primary), दुय्यम (Secondary) व टर्शरी पध्दतीची प्रक्रिया देण्यात येऊन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादनप्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पात सीपीयु हा जास्त क्षमतेचा स्थापित करण्यात येईल. त्याचप्रमाणे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पात कंटीन्युअस ऑनलाईन पर्यावरण मॉनिटरिंग प्रणाली (OCEMS) कार्यान्वित करण्यात येईल. प्रकल्पात निर्माण होणा-य सांडपाण्यामुळे भूगर्भातील पाण्याचे प्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

**३) श्री शरदकुमार शिवराम गांगुर्डे, राहणार- मुक्काम पोस्ट-मुल्हेर,तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

प्रकल्पाकडे येण्या-जाण्यासाठी असणा-या रस्त्यावरुन बैलगाडी, मोठी वाहने यांची वाहतुक होणार आहे. या वाहतुकीमुळे रस्ता खराब झाल्यानंतर त्याची दुरुस्ती कोण करणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** सदरहू रस्त्याची दुरुस्ती ही प्रकल्पाकडूनच करण्यात येईल. स्थानिकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्यात येईल.

**४) श्री रामचंद्र सोनू खरे, माजी उपसरपंच, राहणार-मुक्काम पोस्ट-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

सादरीकरणात प्रकल्प प्रवर्तकांनी हरितपट्टा विकासाचे आश्वासन दिलेले आहे. तर वृक्षारोपण करण्यासाठी शासनाने जे लक्ष्य (target) दिलेले आहे, त्यात वाढ करता येईल का, जेणेकरुन प्रकल्प परिसरातील गावात जेथे शासकीय, ग्रामपंचायतीच्या पडिक जमिनी पडलेल्या आहेत, तेथे प्रकल्पातर्फे वृक्षारोपण करण्यात यावे.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** यांनी आश्वासन दिले की प्रकल्प परिसरातील गावात वृक्षारोपण करण्यात येईल.

**५) श्री बापू बनाजी कुटे, राहणार-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:**

श्री बापू कुटे यांनी सांगितले की माझी शेती प्रकल्पाच्या आजूबाजूस जामोटी शिवारातच आहे. आम्ही विहीरीने पाणी घेत असल्याने प्रकल्पासाठी पाण्याचा ऊपसा केल्यानंतर आमचे पाणी कमी होईल का अशी सर्वांना भिती आहे. त्यासाठी प्रकल्प संचालक मंडळाने स्पष्टीकरण द्यावे. त्याचप्रमाणे स्थानिक शेतक-यांकडूनच प्रकल्पासाठी लागणार कच्चा माल घेण्यात येईल, याबाबतच्या अटी व शर्तीचे पालन करावे, ते भंग होणार नाही याबाबत प्रकल्प संचालक मंडळाने काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** जे काही येथील शेतात उत्पादन निघेल, त्याची साठवण करण्यासाठी एक गोडाऊन बांधण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे योग्य भाव देऊन ही खरेदी करण्यात येईल वाहनाचा खर्च कमी होईल. त्यांनी पुढे सांगितले की पाण्याचा त्रास हा स्थानिकांना होणार नाही. कारण प्रकल्पासाठी हरणधर धरणातील पाण्याचा उपसा करण्यात येणार असून पुढील २५ वर्षांसाठी प्रकल्पासाठी काही पाणी राखीव ठेवण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या शेजारील विहिरींचे पाणी कमी होण्याचा प्रश्नच उद्‌भवत येत नाही.

**६) श्री पोपट मणीराम ठाकरे, सरपंच, जामोटी ग्रामपंचायत, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

**श्री पोपट ठाकरे** यांनी या प्रकल्पाचा ग्रामपंचायतीस काय फायदा होणार आहे, त्याचप्रमाणे प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर ग्रामपंचायत हद्दीतील किती लोकांना रोजगाराची संधि प्रकल्पात मिळेल?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** प्रकल्पात कुशल व अकुशल संवर्गातील व्यक्तींची आवश्यकता असून आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता असल्यास त्यांनी प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल. अकुशल संवर्गात परिसरातील गावांतीलच व्यक्तींनाच रोजगार देण्यात येईल.

**पर्यावरण सल्लागार** यांनी निधीतंर्गत ४० लाख रुपये राखून ठेवण्यात आलेले असून, जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन गरज असलेल्या गावातील विविध सामाजीक उपक्रमांसाठी ते खर्च करण्यात येतील.

**७) श्री शरदकुमार शिवराम गांगुर्डे, राहणार-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

प्रकल्पात उत्पादन प्रक्रियेमुळे जे सांडपाणी निर्माण होईल, ते आजूबाजूच्या शेतक-यांनी मागणी केल्यास त्यांना उपलब्ध करण्यात येईल का?

**सदस्य** यांनी सांगितले की प्रक्रिया केलेले सांडपाणी बाहेर देता येणार नाही, परंतु खत उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले खत स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पात प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुनर्वापर करण्यात येईल.

**८) डॉ. प्रवीण एम. जोशी, सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

**डॉ. प्रवीण एम. जोशी, सदस्य** यांनी विचारणा केली प्रकल्पात रोज किती धान्य लागेल?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** रोज २८-३० टन धान्य लागेल. त्याचप्रमाणे बायोमास म्हणजे कणसाची पाने,भूगा,पाचट,सुकलेला पालापाचोळा आम्ही विकत घेऊ.

**९) श्री लक्ष्मण नारायण शिंदे, राहणार-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

**श्री लक्ष्मण शिंदे** यांनी पशूखाद्य कशाप्रकारे स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देणार अशी विचारणा केली.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** स्थानिक शेतक-यांना पशूखाद्य उपलब्ध करताना प्रकल्पास वाहतुकीचा खर्च येणार नाही. म्हणून स्थानिक शेतक-यांना सवलतीच्या दरात पशूखाद्य देण्याचा प्रयत्न करु.

**१०) श्री शरदकुमार शिवराम गांगुर्डे** यांनी कंपनीच्या गरजेनुसार जर मक्याचे पीक जास्त प्रमाणात घेण्यात आले व शेतक-यांकडे जास्त पीक राहिले, तर प्रथम स्थानिक शेतक-यांचा मका विकत घेण्यात यावा व नंतर बाहेरिल शेतक-यांचा विकत घेण्यात यावा.

**सदस्य,** प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की फक्त २८ टन मका लागणार आहे. तर स्थानिक शेतक-यांच्या पीकास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**११) श्री मोठाभाऊ लक्ष्मण जगताप, उपसरपंच, मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा), जिल्हा-नाशिक:-**

प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरात प्रदूषणाचा काही त्रास होईल काय?

**प्रकल्प पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की परिसरात प्रदूषणाचा त्रास होणार नाही. प्रकल्पात आधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया करण्यासाठी सीपीयु सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. प्रकल्प

चालू असताना उत्पन्न होणा-या राखेवर पाणी शिंपडण्यात येणार आहे. प्रकल्प शून्य द्रव नि:स्सारण म्हणजे झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असल्याने पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

**श्री जगताप** यांनी गावातील परिसर हा संपूर्ण शेती क्षेत्र आहे. येथील उदरनिर्वाहाचे मुख्य साधन शेती आहे. तरी पीकांवर या प्रकल्पाचा दुष्परिणाम होऊ नये अशी सुचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

**१२) श्री राजेन्द्र कुटे, राहणार-मुल्हेर, तालुका-बागलाण (सटाणा),जिल्हा-नाशिक:-**

**श्री राजेन्द्र कुटे** यांनी विचारले की प्रकल्पात कच्चा माल म्हणून धान्य कुठले कुठले घेणार?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** उत्तर दिले की परिसरात जास्त प्रमाणात मका उत्पन्न होत असल्याने प्राधान्याने मकाच घेतला जाईल. जर मका कमी पडला, तर तांदुळ घेण्यात येईल.

**१३) डॉ. प्रवीण एम. जोशी, सदस्य,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-**

**सदस्य** यांनी प्रकल्प प्रवर्तक आणि पर्यावरण सल्लागार यांनी सूचना केली की नुसती सयंत्रणा उभारुन उपयोग नाही. तर त्याची योग्यप्रकारे देखभालही करणे आवश्यक आहे. सदस्य यांनी आक्षेप नोंदविला की बीओडी, सीओडीचे निश्चित प्रमाण दिलेले नाही, फक्त १.० mg/l पेक्षा कमी काम आहे असे नमुद केले आहे. तरी योग्य दुरुस्ती करण्यात यावी.

**सदस्य** यांनी सांगितले की टीओआर प्रमाणे सीईआर २.५% बंधनकारक आहे. त्याप्रमाणे ते वाढवून घेण्यात यावे.ऑनलाईन मॉनिटरींगचे सर्व निष्कर्ष हे गेटवर लावण्यात यावेत. आपण वा-याच्या विरुध्द दिशेस मोजमाप (monitoring) केलेले आहे, त्यांनी Predominant Wind Direction बाबत विचारणा केली व कुठल्या गावाला प्रदूषणाचा त्रास होऊ शकतो याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की जामोटी आणि जाखेड या गावांकडे वा-याची दिशा आहे. धुराडयातुन उत्सर्जित वायुची व हवा गुणवत्तेची माहीती गेटवर लावण्यात येईल. जर योग्य प्रकारे प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आली नाही, तर १० कि.मी. परिघातील गावांना धुलीकणांचा (NOx) SO2 चा त्रास होऊ शकतो. म्हणूनच पर्यावरण व्यवस्थापन योजना भांडवली खर्चाबरोबरच देखभाल खर्चाचेही नियोजन करण्यात येते.

१४) **श्री बन्सीलाल पंडीतराव बत्तीशे** यांनी प्रकल्प प्रवर्तक यांचे प्रकल्प उभारणी योजनेसाठी अभिनंदन केले. या प्रकल्पामुळे स्थनिकांना रोजगार मिळेल व गावाचीही प्रगती होईल.

**आयोजक** यांनी समारोप करताना सांगितले की जनसुनावणीत एकूण ०९ व्यक्तीं बोलल्या, इतर व्यक्ती यांनी दोन-तीन वेळा सूचना/टीकाटिप्पणी/आक्षेप नोंदविले असून त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. बैठकीचे इतिवृत मराठी व इंग्रजीत तयार करुन अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत राज्यस्तरीय पर्यावरण

प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय. महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडे म.प्र.नि.मंडळ मुख्यालयातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सर्व उपस्थितांचे,पत्रकार, शासकीय अधिकारी, स्थानिक जनतेचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या अनुमतीने जनसुनावणी ही संपन्न् झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संपंन्न करण्यात आली.

**(अमर दुर्गुळे)**
आयोजक , पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ
नाशिक,

**(डॉ. प्रवीण एम. जोशी),**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

**(भागवत डोईफोडे),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, नाशिक,
जिल्हा- नाशिक